**<u>आदेश निशाणी क्रं.०१ वर</u>**

(दिनांक १४ मे, २०२५ रोजी पारित )

अर्जदाराने प्रस्तूत प्रकरण कौंटुबीक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम (इतःपर संक्षिप्त मध्ये सदर अधिनियम असे संबोधण्यात येईल) च्या कलम १२, १८, १९, २० व २३ नुसार दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने अंतरीम पोटगी मिळण्याची मागणी केली आहे.

*<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की–</u>*

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, ती गैरअर्जदार क्र.१ ची लग्नाची कायदेशीर पत्नी असून तिचा विवाह दिनांक ०२/०७/२०२१ रोजी जातीतील रिती रिवाजानुसार झाला आहे. विवाहानंतर गैरअज्रदार क्र.१ च्या घरी संताजी नगर, कन्हान, कांद्री, ता.पारशिवनी, जि.नागपूर येथे रहावयास गेली. आई गैरअर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार क्र.१ ची आई आहे तसेच गैरअर्जदार क्र.३ व ४ या गैरअर्जदार क्र.१ याच्या विवाहीत बहीणी आहेत.

३. गैरअर्जदाराच्या कुटुंबामध्ये गैरअर्जदार क्र.२ हिचे वर्चस्व होते गैरअर्जदार क्र.१ हा तीच्या सांगण्याप्रमाणे वागत होता. गैरअर्जदार क्र.१ व २ अर्जदारास नोकराप्रमाणे जगण्यास भाग पाडत होते. गैरअर्जदार क्र.१ व २ हे अर्जदारास त्रास देत होते. गैरअर्जदार क्र.२ ते ४ यांच्या अर्जदारच्या वैवाहीक जीवनात हस्तक्षेपाने अर्जदार हीचे वैवाहीक जीवन उध्वस्त झाले.

४. दिनांक ०४/०७/२०२१ रोजी अर्जदाराने झोपतेवेळी तीचे मंगळसूत्र उशीखाली ठेवले. दूसऱ्या दिवशी ते मिळून आले नाही. त्या रोजी गैरअर्जदार क्र.३ व ४ त्यांची मुले तसेच गैरअर्जदार क्र.२ हे घरी होते. ते अर्जदाराच्या खोलीमध्ये आले होते. त्या कारणाने अर्जदाराने मंगळसूत्र गहाळ

झाल्याबाबत त्यांना विचारणा केली. त्याच रोजी गैरअर्जदार क्र.१ च्या भावाने अर्जदारचा भाउ यास कन्हान येथे बोलावले व अर्जदाराने मंगळसूत्र हरवील्या कारणाने नवीन घेणेकरीता अर्धा रकमेची मागणी केली. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारास छळ करण्यास सुरुवात केली. तसेच तिच्यावर आरोप केले की, हीने मंगळसूत्र चोरले आहे. गैरअर्जदार क्र.२ तीला घाणेरड्या शब्दांत शिवीगाळ करीत होती.

**५.** दिनांक ०९/०७/२०२४ रोजी अर्जदाराचा भाउ अखाडिच्या सणाकीरता तीला घेण्यासाठी आला असता गैरअर्जदार क्र.३ हीने तिच्या भावासोबत भांडण केले व म्हणाले की, **'तूझ्या बहीणीची लायकी नाही, इथे संसार करायची.'** त्यानंतर अर्जदार ही तीच्या माहेरी आली. लगेच दुसऱ्या दिवशी गैरअर्जदार क्र.१ ने लग्नातील मध्यस्ती भालचंद्र चोपकर आणि लटारु सरोदे यांना अर्जदाराची माहीती पाठवीली. त्यांनी अर्जदाराच्या वडिलास असे म्हटले की, **'तुमच्या मुलीने मंगळसूत्र लपवून ठेवले असेल तर देवून द्या.'** गैरअर्जदार क्र.१ हा सतत अर्जदारावर खोटे आरोप लावून मानसिक त्रास देत असे. तसेच मंगळसूत्राची रक्कम मिळणेबाबत तिच्यावर दबाव टाकत असे. जेव्हा अर्जदार ही सासरी परत आली तेव्हा गैरअर्जदार क्र.२ यांनी अर्जदार व तीच्या वडिलांचा अपमान केला, व म्हणाले की, **'तुमची मुलगी बेअक्कल व गैरजबाबदार आहे, हिने आपले मंगळसूत्र हरविले म्हणले तीचा नवरा त्याच दिवशी हरविला.'** गैरअर्जदार क्र.२ हिने अर्जदाराचे सर्व दागीने काढून घेतले.

**६.** गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास म्हटले की, तू इथून निघून जा. गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी अर्जदारासोबत भांडण केले. अर्जदाराची कोणतीही चूक नसताना वैवाहीक जीवन वाचविणेकरीता तीने माफी मागीतली व घरात राहू देण्यास विनंती केली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ व २ सतत तिच्यासोबत मंगळसूत्राच्या कारणावरुन भांडण करीत होते तसेच शंकास्पद नजरेने पाहत असे. तिला म्हणत असत की, **'तू आपल्या बापाला पैशे माग, मंगळसूत्र घेवून माग, येथे**

**कोणी रिकामे बसले नाही, तुझ्यासाठी पैशे कमवायला'.** गैरअर्जदाराच्या अश्या वर्तणूकीने अर्जदारास मानसिक त्रास होत असे. परंतु वैवाहीक जीवन सुरळीत होईल या आशेने ती गैरअर्जदारांचा त्रास सहन करीत होती. गैरअर्जदाराने तीचा मोबाईल फोनसुध्दा हिसकावून घेतला होता.

७. अर्जदार ही एम.कॉम. शिकत होती. तिला लग्नानंतरसुध्दा तीचे शिक्षण सुरु ठेवायचे होते. परंतु गैरअर्जदार क्र.१ ने शिक्षण सुरु ठेवण्यास विरोध केला. लग्नाचे वेळेस नातेवाईकांने भेटवस्तू देणेएवजी रु.१,००,०००/– (रुपये एक लाख फक्त) नगदी दिले. सदर रक्कम गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराकडून घेतली. अर्जदारास तीच्या माहेरी जावू देत नसत. अर्जदार माहेरी गेली की तीला घरात घेणार नाही अशी धमकी देत असत. तसेच तीला फारकत देण्याची धमकी देत असे. अश्या प्रकारे तीचा शरिरीक व मानसिक छळ करीत असे.

८. लग्नापूर्वी अर्जदार ही काम करीत होती. तीच्या खात्यामध्ये रु.३०,०००/– (रुपये तीस हजार फक्त) तसेच पी.एफ. चे रु.५२,०००/– (रुपये बावन हजार फक्त) होते . सदर रक्कम गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या खात्यात घेतली तसेच या प्रकारे अर्जदाराकडून गैरअर्जदार क्र.१ ने रु.१,८२,०००/– (रुपये एक लाख ब्यांशी हजार फक्त) घेतले.

९. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास दिवाळी, भाउबिज या सणाला सुध्दा माहेरी जावू देत नसे. तसेच अर्जदारास असे म्हणत होते की, **'कशाला राहते पारशिवनीला तीथे तूझ्या याराला भेटायला जाते का.'** जेव्हा–जेव्हा अर्जदाराचे वडिला तीच्या घरी येत होते तेव्हा गैरअर्जदार क्र.२ तीच्या वडिलांसोबत बोलत नसे. या प्रकारच्या मानसिक त्रासाने अर्जदाराचे खचीकरण होत होते. जेव्हा अर्जदार हिम्मत करुन गैरअर्जदारांच्या अत्याचाराविरुध्द बोलत असे तेव्हा गैरअर्जदार तिला म्हणत असत की, **'आपली बॅग भर आणि माहेरी चाल्नी जा, पुन्हा येथे येवू नको तोंड दाखवायला, आणि नंतर कोर्टमध्ये भेटू.'**.

**१०.** अर्जदार जेव्हा बीमार असत व हॉस्पीटलमध्ये भरती असत तेव्हा गैरअर्जदार क्र.१ याने पती या नात्याने काणताही मानसिक आधार दिला नाही. तसेच तो म्हणत होता की, **'तू लवकर मरुन जा, मी दुसरे लग्न करतो.'** तसेच अर्जदारास तीच्या झोपण्याचा खोलीचा दरवाजा सुध्दा बंद करु देत नसे. अर्जदार ही गरोदर असतांना तीला गैरअर्जदार क्र.१ ह्याने मारहान केली, तेव्हा तीला सीटी हॉस्पीटल कामठी येथे भरती करण्यात आले होते. गैरअर्जदारकडे चार चाकी वाहन असतांना सुध्दा अर्जदारास बाळंतपणाकरीता दुचाकीवर घेवून गेले. बाळंतपणा नंतर सुध्दा तीची व्यवस्थित काळजी घेतली नाही. गैरअर्जदार क्र.१ तीला **'बेशरम, सायको, तुझ्या बापाने तुझे लग्न माझ्याशी लावून दिली, आता त्यांची जबाबदारी संपली, आता तुझ माहेरी जाण्याचे काही काम नाही, आणि तेथे गेली तर वापस यायचे नाही, तुझ्या पोटात कोणाच पाप घेवून फिरत आहे,'** या शब्दांत बोलून तीचा मानसिक छळ करत असे.

**११.** गैरअर्जदार क्र.२ व ३ अर्जदारास म्हणायचे की, आमच्या भावाला सरकारी नोकरी आहे, रु.१,००,०००/– महीना पगार आहे, त्याला कोणीपण मुलगी द्यायला तयार आहे, आम्ही त्याचे दुसरे लग्न करुन देवून. दिनांक २६/१२/२०२३ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने दिवाळी करीता पारशिवनी येथे आणले. परंतू, तो अर्जदाराच्या वडिलांच्या घरी आला नाही, त्याने घरापासून एक किलोमीटर दूर तिला सोडले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास दिनांक १०/०५/२०२४ रोजी मोबाईलवर संदेश पाठविला की, कोर्टात येवून फारकत दे तसेच तिला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर दिनांक ०४/०६/२०२४ रोजी खोटे आरोप लावून गैरअर्जदाराने अर्जदारास नोटीस पाठविले. या नोटीसला अर्जदाराने उत्तर देवून गैरअर्जदारासोबत राहणे तिच्या जिवाला धोका आहे, त्या कारणाने ती नांदण्यास येवू शकत नाही, असे सांगून रु.५०,०००/– प्रति महीना पोटगीची मागणी केली. परंतू, गैरअर्जदाराने तिला पोटगी दिली नाही. उलट तीला मोबाईलवर मैसेज पाठविला की, **'जीवन भर पैसे घेवून गांडीत पुंगळ्या करुन भरजो आणि नाही मावन न तर आपल्या माई बापाच्या गांडीत भरजो. त्या साठी त**

**लग्न केली की एक पोट्ट पैदा करुन घ्याचं आणि त्याच्या बापा कडून पैसे घ्याचं कारण भाड खाउ तर आहा मादरचोद्या तुम्ही साले. सर्व अस्सल भिकारी आहे तुम्ही.**' करिता अर्जदाराने प्रति माह रु.५०,०००/– अंतरीत पोटगीची मागणी केली आहे.

**१२.** गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी नि.क्र.११ वर त्यांचे लेखी उत्तर सादर करुन अर्जातील गैरअर्जदारांविरुध्द केलेले संपूर्ण आरोप नाकारले आहे, तसेच असे कथन केले आहे की, गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द कोणताही कौटूंबिक हिंसाचार केला नाही. जेव्हा सोन्याचे मंगळसूत्र हरवीले, तेव्हा अर्जदारास विचारले असता अर्जदाराने गैरअर्जदारासोबत भांडण केले व माहेरी जाण्याची धमकी दिली. तसेच अर्जदार ही सतत माहेरी जाण्याची मागणी करुन गैरअर्जदारावर दबाव आणू लागली.

**१३.** अर्जदार ही नेहमी पैशाची मागणी करुन व तब्बेतीची कारण सांगून कोणालीही न सांगता माहेरी निघून जायची. अर्जदार ही मार्च, २०२३ मध्ये गैरअर्जदाराच्या आईसोबत भांडण करुन तीन महीन्याचा बाळाला दुध न पाजता घरी निघून गेली. गैरअर्जदारासोबत भांडण करुन वेगळे राहण्यास जबरदस्ती करीत असे, तसे नाही केले तर सोडचिठ्ठीची धमकी देत असे. गैरअर्जदाराची आई हृदव विकाराने आजारी असल्याने तो आईच्या रुममध्ये काळजी घेण्याच्या उद्देशाने आईच्या रुममध्ये झोपायचा तेव्हा अर्जदार त्यास म्हणायची की, **आईसोबत झोपायचे होते तर माझ्यासोबत लग्न कशाला केले, आई लवकर मरुन गेली तर माझी सुटका होईल**. गैरअर्जदाराच्या तीन विवाहीत बहीणी राखी व अक्षद लावणेकरीता घरी आल्या असता अर्जदार त्यांच्यासोबत भांडण करायची.

**१४.** अर्जदार हीची लग्नापूर्वीपासून मानसीक स्थिती बरोबर नव्हती, म्हणून ती ओम–शांती केंद्रामध्ये जावून राहत होती. अर्जदार ही सतत म्हणायची की, माझ्या मनाविरुध्द माझ्या आई–वडिलांनी जबरदस्तीने लग्न करुन दिले आहे

व सोडचिठ्ठीची मागणी करायची व संपूर्ण कुटुंबाला कोणत्या ना कोणत्या कारणावरुन मानसिक त्रास द्यायची.

**१५.** दिनांक २९/११/२०२३ रोजी अर्जदार दुसऱ्यांदा गरोदर असतांना भांडण करुन निघून गेली व दिनांक ३०/११/२०२३ रोजी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली. तसेच गैरअर्जदार याने माहीती न देता गर्भपात केला. दिनांक २६/१२/२०२३ रोजी अर्जदार गैरअर्जदाराला न सांगता माहेरी निघून गेली व सासरी परत आली नाही. अर्जदार ही सोडचिठ्ठीची मागणी करीत आहे. गैरअर्जदार हा मुलाच्या भविष्याचा विचार करता तिच्यासोबत राहण्यास तयार आहेत्र. गैरअर्जदा क्र.१ याने नांदण्यास येण्या करीता न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. या कारणास्तव अर्जातील कोणतीही मागणी मंजूर होण्यास पात्र नाही.

**१६.** अर्जाचे व गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी नि.क्र.११ दिलेल्या लेखी उत्तराचे अवलोकन केले. अर्जदाराचे विधीज्ञ उमाकांत सपकाळ व तसेच गैरअर्जदाराचे विधीज्ञ ए.जी. महाजन यांचा युक्तीवादाचे श्रवण केले.

**१७**. उभयतांच्या कथनांचा व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे तरतुदींचा विचार करता खालील वादप्रश्न उपस्थीत होत असुन त्यावरील निष्कर्ष कारणांसह नोंदवीण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्श** |
|---|---|---|
| १) | गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृत दर्शनी शाबित केले आहे काय? | होय |
| २) | अर्जात मागितलेल्या अंतरिम पोटगी मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | अंशतः होय |
| ३) | आदेश काय ? | अंतीम आदेशा प्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

**१८.** गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केलेला असुन ती स्वतःची उपजिवीका करण्यास असमर्थ असल्याने अर्ज मंजूर करण्यात यावा असा युक्तीवाद अर्जदाराचे विव्दान विधीज्ञ करतात. याउलट गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा छळ केला नसुन ते तिला सांभाळण्यास तयार असल्याने व ती स्वताःच्या मर्जीने माहेरी राहत असल्याने अर्ज नामंजुर करण्याचा युक्तीवाद गैरअर्जदारांचे विव्दान विधीज्ञ करतात. दोन्ही विव्दान विधीज्ञांचा युक्तीवादाची सत्यता पडताळून पाहण्यापुर्वी उभयतांना मान्य असलेल्या बाबींचा विचार करणे गरजेचे आहे. दोन्ही पक्षास मान्य असलेल्या बाबी खालील प्रमाणेः–

''*अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ याचा विवाह संपन्न झाला असुन त्यांचे विवाह संबंध आजपावेतो कायम आहेत व या विवाह संबंधातुन अर्जदारास मुलगा जन्माला आला आहे. तसेच अर्जदार मुलासह माहेरी राहत आहेत*''

### <u>वादप्रश्न क्र.१ करीताः–</u>

**१९.** गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला किंवा नाही हे निश्चित करण्यापूर्वी सदर अधिनियमात कलम ३ अन्वये कौटुंबिक हिंसाचार म्हणजे पिडीत व्यक्तीचा कुटूंबातील सदस्यांनी केलेला शारिरीक, लैंगिक, भावनिक व आर्थिक दुरुपयोग होय. सदर दुरुपयोगापैकी एक जरी शाबीत झाला तरी पिडीत व्यक्तीचा कौटुंबिक हिंसाचार झाला असे म्हणता येईल.

**२०.** सदर अधिनियमातील कलम २३ अन्वये दिलेल्या तरतुदीचे अवलोकन करणे गरजेचे आहे. सदर तरतुदीनुसार गैरअर्जदारांनी अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्यास आणि तसा हिंसाचार ते करण्याची शक्यता असल्यास सदर अधिनियमाचे कलम १८ ते २२ अन्वये

अर्जदारास तुतातूर्त अनुतोष मागता येतो. करीता सदरच्या अर्जाच्या निर्णयासाठी गैरअर्जदार यांनी कौटूंबिक हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी शाबीत करण्ये गरजेचे आहे.

२१. गैरअर्जदारांच्या विद्वान विधीज्ञांचा असा युक्तीवाद आहे की, अर्जदाराने कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळणेकरीता वेगळा अर्ज सादर केला नाही, त्या कारणास्तव अर्जदार अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र नाही. उलटपक्षी अर्जदारांच्या विद्वान विधीज्ञांचा असा युक्तीवाद आहे की, अर्जदाराने मुळ अर्जात अंतरिम पोटगी मिळण्याची मागणी केली आहे, करिता अधिनियमातील तरतूदी व महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम, २००६ यांतील तरतूदींचा अंतरिम पोटगी मिळणेकरीता वेगळ्या अर्जाची गरज नाही. या करिता अर्जदारांचे विधिज्ञ यांनी ***मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या रिट याचिका क्र.१५५२/२००८ विशाल दामोदर पाटील वि. विशाखा विशाल पाटील,*** न्यायनिवाड्यावर आपली भिस्त ठेवली आहे. सदर प्रकरणातील असे सारसुत्र आहे की, अधिनियम, २००५ च्या कलम १२, १८ ते २३ तसेच महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम, २००६ मधील नियम ७ नुसार न्यायदंडाधिकारी यांना अंतरिम पोटगी मंजूर करता येते परंतू मंजूर करण्यापूर्वी गैरअर्जदारास ऐकूण घेण्याची संधी दिली पाहीजे, या करीता वेगळा अर्ज सदर अधिनियमातील कलम २३ प्रमाणे दाखल करण्याची गरज नाही.

२२. वरील खटल्यातील सारसुत्रानुसार या प्रकरणात गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी उत्तर नि.क्र.११ वर सादर केले आहे. तसेच त्यांना अर्जदाराच्या अंतरिम पोटगी मागणीची पूर्ण कल्पना आहे व त्यावर गैरअर्जदारांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद सुध्दा ऐकण्यात आला आहे. त्या कारणास्तव अर्जदाराची अंतरीम पोटगीच्या मागणीकरीता वेगळ्या अर्ज सदर अधिनियमातील कलम २३ प्रमाणे दाखल करण्याची गरज नाही.

**२३.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील विवाह संबंध तसेच या विवाह संबंधातून अर्जदारास झालेला मुलगा तसेच सध्यास्थितीत अर्जदार व तीचा मुलगा हे दोघेही गैरअर्जदार क्र.१ पासून वेगळे अर्जदार हीच्या माहेरी राहत असल्याची बाब वादांकित नाही.

**२४.** अर्जदाराचे असे कथन आहे की, विवाह संपन्न झाल्यापासून ते दिनांक २६/१२/२०२३ पर्यंत गैरअर्जदारांनी तीला वेगवेगळ्या कारणावरुन शारिरीक व मानसिक त्रास देवून कौटूंबिक हिंसाचार केला आहे. यामध्ये प्रथम तिने असे कथन केले आहे की, अर्जदाराचे मंगळसूत्र हरविले असता तिच्यावर चोरीचा आरोप लावून तीला घाणेरड्या, अश्लील शब्दांन शिवीगाळ केली. तीचा भाउ तिच्या घरी आला असता त्याच्यासोबत सुध्दा भांडण करुन, तूझ्या बहिणीची लायकी नाही, इथे संसार करायची असे म्हटले. तसेच अर्जदाराच्या वडिलांचा अपमान केला व म्हटले की, तुमची मुलगी बेअक्कल व गैरजिम्मेदार आहे, हिने आपले मंगळसूत्र हरवीले म्हणजे आपला नवरा हरविला. तसेच गैरअर्जदार क्र.१ म्हणत होता की, तू आपल्या बापाला पैसे माग, इथे कोणही रिकामे बसले नाही, तुझ्यासाठी पैशे कमवायला.

**२५.** गैरअर्जदार अर्जदारास म्हणत होते की, कशाला जाते पारशिवनीला, तेथे तूझ्या याराला भेटायला जाते का. आपली बॅग भर आणि आपल्या माहेरी चालली जा, पुन्हा येथे येवू नको तोंड दाखवायला आणि नंतर कोर्टात भेटू. गैरअर्जदार हा अर्जदाराला मानसिक त्रास देत होता, तसेच तू लवकर मरुन जा मग मी दूसरे लग्न करुन घेईल, तसेच तीला राई–रोगी, बेशरम, सायको, तूझ्या पोटात कोणाचे पाप घेवून फिरत आहे असे म्हणून तीचे मानसिक खच्चीकरण करीता होते, तसेच तिला जिवे मारण्याची धमकी देत होते.

**२६.** दिवाळीच्या सणाला अर्जदाराला दिनांक २६/१२/२०२३ रोजी माहेरी आणून सोडले परंतू तीला परत घ्यायला आला नाही. दिनांक

२२/०५/२०२४ रोजी फोन करुन धमकी दिली की, तूझे लग्नातील आंदन घेवून जा व मुलाला घरी घेवून ये, तसेच शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द तक्रार सुध्दा केली आहे, त्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे.

२७. गैरअर्जदार क्र.१ याने तीला नोटीस पाठवून नांदण्यास येण्यास कळविले, यावर अर्जदाराने तीच्या जीवीतेला धोका असल्याने ती गैरअर्जदार क्र.१ याच्यासोबत नांदू शकत नाही असे उत्तर दिले व पोटगीची मागणी केली. यावर गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराच्या मोबाईलवर संदेश पाठविला की, **'जीवन भर पैसे घेवून गांडीत पुंगळ्या करुन भरजो आणि नाही मावन न तर आपल्या माई बापाच्या गांडीत भरजो. त्या साठी त लग्न केली की एक पोट्ट पैदा करुन घ्याचं आणि त्याच्या बापा कडून पैसे घ्याचं कारण भाड खाउ तर आहा मादरचोद्या तुम्ही साले. सर्व अस्सल भिकारी आहे तुम्ही.'**

२८. वरील अर्जदाराच्या कथनावरुन प्रथमदर्शी असे दिसून येते की, तीचा गैरअर्जदार यांनी वारंवार शिवीगाळ करुन, धमकी देवून मानसिक छळ केला आहे, या करीता तीने पोलीस तक्रार सुध्दा दिली आहे. पोलीस तक्रार दिल्याची बाब गैरअर्जदारांनी कबूल केली आहे. गैरअर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार हे गैरअर्जदारासोबत संसार करण्यास ईच्छूक नाही, करीता ती स्वईच्छेने माहेरी गेली व दुसऱ्यांदा गरोदर असतांना गैरअर्जदाराला न सांगता गर्भपात केला. गैरअर्जदारांच्या या कथनानुसार अर्जदाराचा विवाह तीच्या ईच्छे विरुध्द बळजबरीने गैरअर्जदार क्र.१ सोबत झाला असेल तर एक मुल होईस पर्यंत तसेच दुसऱ्यांदा ती गरोदर राहीपर्यंत अर्जदार गैरअर्जदारासोबत संसार करणे शक्य नाही.

२९. गैरअर्जदाराने नांदविणेकरीता अर्जदाराविरुध्द प्रकरण दाखल केले असले तरी अर्जदाराने अर्जात कथन केलल्या त्रासापोटी तीच्या जीवीतेला गैरअर्जदारापासनू धोका असल्याने ती गैरअर्जदारासोबत संसार करुन शकत

नाही, असे कथन केले आहे. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास नोटीस देवून सोबत संसार करण्याची मागणी केली. परंतू, अर्जदाराच्या मागणी प्रमाणे ती वेगळी राहत असून सुध्दा आज पर्यंत तीच्या पालन पोषणाची कोणतीही जबाबदारी त्याने पार–पाडलेली दिसून येत नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांनी एकमेकांविरुध्द कथन केले आहे. त्यांचे कथन दोन्ही पक्षांना योग्य पूराव्याची संधी देवून त्यांनी केलेले कथन सिध्द करण्याचा अधिकार आहे. परंतू, अर्जदार ही अंतरीत पोटगी मिळणेकरीता पात्र आहे किंवा नाही या करीता ती प्रथमदर्षणी हिंसाचाराचा बळी आहे किंवा नाही, हे पाहणे गरजेचे आहे.

३०. आज रोजी अर्जदाराने केलेले कौटूंबिक हिंसाचाराचे आरोप यावर अविश्वास ठेवण्यास कोणतेही कारण नाही. कोणतीही स्त्री सर्व प्रथम आपला संसार सांभाळणेकरीता पोलीस स्टेशनमध्ये तक्रार न देता होत असलेला कौटुंबिक हिंसाचार सहन करते व नायलाजास्तव शेवटी तक्रार देते. गैरअर्जदांचे असे कथन आहे की, अर्जदार हीने दिलेली तक्रार ही खोटी असल्याने पोलीसांनी गैरअर्जदारांविरुध्द कार्यवाही केली नाही. परंतू, अभिलेखावर दाखल असलेल्या तक्रारीचे प्रत पाहता ती अदखपात्र गुन्ह्याची नोंद दिसून येते. यावरुन प्रथमदर्शणी असे सिध्द होते की, अर्जदार व गैरअर्जदार यांमध्ये वाद आहे व या वादातून अर्जदार हीने पोलीस तक्रार नोंदविली आहे. उपरोक्त कारणास्तव अर्जदार ही प्रथमदर्शनी कौटुंबकि हिंसाचाराचा बळी असल्याचे दिसून येते.

३१. परस्पर विरोधी विधाने बघता सद्य–स्थितीत अर्जदाराचे शपथेवरील कथन व अभिलेखावर दाखल असलेले दस्तऐवज यावरुन हे प्रथम दिर्शनी दिसुन येते की, अर्जदार ही मुलासह गैरअर्जदार क्र.१ पासुन विभक्त होवुन तिच्या आई वडीलांकडे राहत आहेत. उपरोक्त चर्चेवरुन प्रथम दर्शनी असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र.१ याची अर्जदार व मुलास पालन पोषनाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी असतांना ती पार पाडण्यास त्याने कसुर केला आहे व त्यांनी अर्जदारावर कैांटुबिक हिंसाचार केला आहे. करीता वादप्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवीण्यात येते.

<u>**वादप्रश्न क्र. २ करीताः–**</u>

**३२.** अर्जदाराने रु.५०,०००/–अंतरीम पोटगीची मागणी केली आहे. कोणत्याही स्त्रीचे लग्न झाल्यानंतर तिच्या निर्वाह भत्त्याची जबाबदारी कायदयाने पतीवर असते. लग्नानंतर लगेच पत्नीला निर्वाह भत्त्याचा अधिकार प्राप्त होते. "निर्वाह भत्ता" या शब्दाची व्याख्या हिंदु दत्तक विधान व निर्वाह कायदा, १९५६ चे कलम ३(ब) मध्ये नमुद करण्यात आलेली आहे. निर्वाह भत्ता म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि औषधोपचार यासाठी करण्यात येणारी आर्थिक तरतुद होय. पत्नीचे पालनपोषन करणे ही प्रत्येक पतीची नैतीक जबाबदारी असते. याशिवाय प्रत्येक पतीची नैतीक असते. स्वतःच्या अज्ञान मुला–मुलींचे पालणपोषण करण्याची सुध्दा प्रत्येक पित्याची नैतीक जबाबदारी असते.

**३३.** अंतरिम निर्वाह भत्ता मिळण्यास अर्जदार पात्र आहेत किंवा नाहीत हे निश्चित करण्यापुर्वी ते स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे किंवा काय? अर्जदारांचा उदरनिर्वाह करण्याइतपत गैरअर्जदार नं.१ याची आर्थीक ऐपत आहे किंवा काय? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. अर्जदाराचे असे कथन आहे की ती तिचा व तिच्या मुलाचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार नं.१ अर्जदाराच्या उत्पन्ना बाबत कोणतेही कथन केले नाही.

**३४.** अर्जदाराचे असे कथन आहे की, गैरअर्जदार नं.१ हा वेस्टर्न कोलफील्ड लिमीटेड या कंपनी मध्ये नोकरीला आहे व त्याचा मासीक पगार रु.८३,०००/– आहे. तसेच गैरअर्जदार नं.१ यास वार्षिक बोनस जवळपास रु.२,००,०००/– ते रु.३,००,०००/– मिळतो व घरभाडे रु.१२,०००/– मिळते असे एकुण गैरअर्जदार नं.१ याचे मासीक उत्पन्न रु.१,३०,०००/– आहे. अर्जदाराने माननीय मुंबई उच्चन्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे न्यायनिवाडयावर आपली भिस्त ठेवली. ***हेमंत साली वि. मनीषा साली जे २०२१ALL MR(Cri.)२४८७*** या प्रकरणातील सारसुत्र असे आहे की, पोटगीलची रक्कम ही

गैरअर्जदाराचे पगाराच्या /उत्पन्नाचे ३०% दयायला पाहीजे. तसेच नितिन जाधव वि. पल्लवी जाधव जे २०१६ MH.L.J,(Cri.)१९१ या प्रकरणातील सारसुत्र असे आहे की, पोटगीची रक्कम निश्चीत करतांना गैरअर्जादारो एकुन पगार (gross salary)ची रक्कम लक्षात घ्यावयास पाहीजे.

**३५.** अर्जदारांच्या विव्दान विधीज्ञ यांचा असा युक्तीवाद आहे की, गैरअर्जदार क्र.१ ने दस्त यादी नि.क्र.१६ वर दस्त क्र.१० बॅकचे खाते उतारे मध्ये गैरअर्जदार क्र.१ यास ब्लॅक डिममंड कर्मचारी यांचे कडुन जवळपास रु.१८,४५,३८१/– प्राप्त झाल्याचे नोंदी आहेत तसेच चैतन्य राईस मिल यांचे कडुन रु.७०,०००/– प्राप्त झाल्याची नोंद आहे. तरी गैरअर्जदारचे पगारा सोबत सदर उत्पन्न सुध्दा लक्षात घेण्यात यावे.

**३६.** जरी गैरअर्जदाचे बॅंकखाते उताऱ्यावर पगाराशिवाय ईतर रकमेची नोंद दिसून येत असली तरी गैरअर्जदार क्र.१ यास नियमीत सदरचे उत्पन्न मिळतेच हे प्रबळ पूराव्याशिवाय आज रोजी ग्राह्या धरता येणार नाही. अर्जदाराचा विद्वान विधीज्ञांचा असा युक्तीवाद आहे की, गैरअर्जदार क्र.१ याने नि.क्र.१६ वर दस्त क्र.३ वर वर्ष २०२४–२५ चे इनकम टॅक्स रिटर्न दाखल केले आहे त्यावरुन गैरअर्जदाराचे मासिक पगाराचे रक्कम रु.८३,०७७/– एवढी येते. त्या कारणाने गैरअर्जदार क्र.१ चा पगार रु.८३,०७७/– समजण्यात यावा. गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांचा असा युक्तीवाद आहे की, गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर आईची जबाबदारी आहे व ती हृदय रोगी आहे. तीच्यावर दिनांक २४/१२/२०२२ रोजी स्पेसमेकर करीता शस्त्रक्रीया करण्यात आली. अर्जदाराचे असे कथन आहे की, गैरअर्जदार क्र.१ च्या आईला पतीचे सेवानिवृत्तीचे वेतन मिळते. त्या कारणाने ती, गैरअर्जदार क्र.१ वर अवलंबून नाही. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादावरुन आज रोजी गैरअर्जदार क्र.१ वर त्याच्या आईची जबाबदारी नाही असे समजता येणार नाही, कारण अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ च्या आईला सेवानिवृत्तीची रक्कम मिळते व ती किती मिळते याबाबत प्रथमदर्षणी कोणताही पूरावा अभिलेखावर दाखल केला नाही.

**३७.** वरील सर्व बाबींचा तौलानीक दृष्टया अभ्यास केला असता तसेच अर्जदार व तीच्या मुलाच्या गरजा व गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदारांव्यतीरिक्त आईच्या पालन पोषनाची जबाबदारी तसेच आज रोजी जीवनाश्यक वस्तुंचे वाढलेले भाव या सर्व बाबी लक्षात घेता मी या निष्कर्षास येतो की, अर्जदार क्र.१ प्रतिमहा रु.१६,०००/– (रुपये सोळा हजार फक्त) अंतरीम पोटगी म्हणुन अर्ज दाखल तारीख २६.०८.२०२४ पासुन मिळण्यास पात्र ठरते. या कारणास्तव वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष मी अंशतः होकारार्थी नोंदवीत आहे.

**३८.** कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ या कायदयाचा प्रमुख उद्वेश लक्षात घेता व सदर कायद्याचा उद्वेश जोपासण्याच्या दृष्टीने आणि वादप्रश्न क्र.१ व २ चा निष्कर्षन्वये अर्जदाराची अंतरीम पोटगीची मागणी अशंतः मंजूर होण्यास पात्र ठरते. सबब वादप्रश्न क्र.३ चा निष्कर्ष नोंदविण्या करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराची अंतरीम पोटगीची मागणी अंशतः मंजुर.

२. महेंद्र बबनराव चामट (गैरअर्जदार क्रं.१) यांनी अर्जदार मिनाक्षी महेंद्र चामट हिस अंतरिम पोटगी प्रतीमहीना रु.१६,०००/– (रुपये सोळा हजार फक्त्) दि.२६.०८.२०२४ पासुन मुळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत द्यावे.

३. आदेशाची प्रत विनामुल्य अर्जदारास देण्यात यावी.

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.05.14 17:43:07 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

दिनांक– १४/०५/२०२५.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पारशिवनी.

# **शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पि.डी.एफ. न्यायनिवाडा फाईल मधील मजकुर मुळ न्यायनिवाडयातील मजकुराचे शब्द नी शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव :– प्रिवेल वि. फाले (लघुलेखक–III)

कोर्टाचे नावः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पारशिवनी